रे.के.नं.१०२/२०२४
नि. क्र.१३

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ ची जबानी**
**माझे नाव** – निलेश सिताराम जाधव
**वय वर्षे** –४३, **व्यवसाय** – मंडप
**राहणार** – डुगवे, बौध्दवाडी, ता.चिपळूण, जि.रत्नागिरी, हल्ली मु.नेरुळ नवी मुंबई.
**मी सत्य प्रतिज्ञेवर असे कथन करतो की,**

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीम.एस.आर.वनकर यांचेमार्फत सुरु.</u>**

आरोपी दत्ताराम रामजी जाधव माझे चुलते आहेत. त्यांना मी ओळखतो. ते आज रोजी हजर आहेत. दि.२२.०७.२०२४ रोजी मी घरी होतो. रात्री ०८.३० वा. सुमारास माझ्या चुलत्याचा मुलगा विहीरीत पडला असा ओरडण्याचा आवाज आला म्हणून मी पाहण्यास गेलो असता गर्दीमध्ये माझ्या उजव्या खांद्यावर कोणतरी मारल्याचे जाणवले. हे म्हणणे खरे नाही की, दि.२२.०७.२०२४ रोजी रात्री ०८.३० वा. सुमारास आरोपीने माझे घर उध्वस्त करतोस का असे बोलून बांबूच्या काठीने उजव्या खांद्यावर फटका मारला.

**<u>साक्षीदार अभियोग पक्षाला सहाय्य करत नसलेने सरकारी वकील यांचे तोंडी विनंतीवरुन त्यांना भारतीय साक्ष अधिनियम कलम १५७ अन्वये उलट तपासादरम्यान विचारण्यात येणारे प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली व ती दिली.</u>**

**२.** हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने बांबूच्या काठीने माझ्या डाव्या डोक्यात फटका मारला. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे माझ्या डोक्यातून रक्त येवू लागले. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे वाडीतील लोक जमा झाले. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीस स्टेशनला जबाब दिला. आता मला दि.२३.०७.२०२४ रोजीचा जबाब दाखवला. त्यावर माझी सही आहे. साक्षीदाराने सही ओळखल्याने **सहीला नि.१४** देण्यात येते.

आता मला अधोरेखांकित भाग अ वाचून दाखविला. हे म्हणणे खरे नाही की, सदर मजकूर मी पोलीसांना सांगितला. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व माझे मध्ये आपसात तडजोड झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आरोपीला शिक्षा होवू नये म्हणून खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण**.

**उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री.आर.व्ही.बापट यांनी नाकारला**

**फेरतपास नाही**.

श्रवणोत्तर स्विकृती.
सही/-
(वाय.सी. पाटील )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, व
न्यायादंडाधिकारी वर्ग-१,चिपळूण

दिनांक -०५/०६/२०२६
चिपळूण.

**- प्रमाणपत्र -**

मी हमी देतो की, सदरच्या पी. डी. एफ. फाईलमधील मजकुर हा मुळ पुराव्यामधील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | एम.इ.आरेकर, लघुलेखक श्रेणी–३ |
| न्यायालयाचे नाव | सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, चिपळूण, ता.चिपळूण जि.रत्नागिरी. |
| पुरावा टंकलेखीत दिनांक | ०५.०६.२०२६ |
| न्यायिक अधिकारी यांनी सही केलेले दिनांक | ०५.०६.२०२६ |
| पुरावा अपलोड केलेले दिनांक | ०५.०६.२०२६ |